1) पुढारी पान क्र. 1 दि. 09/11/2022

# दाऊदचा पुन्हा देशावर दहशतवादी हल्ल्याचा कट

## कुख्यात डॉनकडून हवालामार्गे तेरा कोटी रुपये भारतात


**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

मुंबईत 'डी गँग'च्या हस्तकांवर आरोपपत्र दाखल केल्यानंतर राष्ट्रीय तपास संस्थेने (एनआयए) 'टेरर फंडिंग' प्रकरणातून आणखी एक खळबळजनक माहिती समोर आणली आहे. मुंबई बॉम्बस्फोट, लोकल बॉम्बस्फोट, २६/११ नंतर पुन्हा एकदा दाऊद इब्राहिम तसेच त्याचा पंटर छोटा शकील हे भारतावर दहशतवादी हल्ले करण्याच्या तयारीत आहेत, असा गौप्यस्फोट 'एनआयए'ने केला आहे. या कटाकडे 'एनआयए'ने आरोपपत्राद्वारे न्यायालयाचे लक्ष वेधले आहे.

हवाला व्यवहाराच्या माध्यमातून दाऊदने पाकिस्तानातून २५ लाख रुपये दुबईत मागविले. नंतर हे पैसे व्हाया सुरत, मुंबईला दाखल झाले. हे पैसे आरिफ अबू बकर शेख ऊर्फ आरिफ भाईजान आणि शब्बीर अबू बकर शेख यांना पाठवण्यात आले आहेत. अशाप्रकारे दाऊद इब्राहिम व छोटा शकीलने गेल्या ४ वर्षांत भारतात १२ ते १३ कोटी रुपये पाठवले आहेत. सुरत येथील हवाला ऑपरेटरकडून 'एनआयए'ला याबाबतची माहिती उपलब्ध झाली आहे. सुरक्षेच्या कारणास्तव हवाला ऑपरेटर कोण, ते सांगण्यात आलेले नाही. त्याची ओळख गोपनीय

/...२

### दाऊद-'आयएसआय'चा 'हा' होता कट



१ फेब्रुवारीत 'एनआयए'ने हा गुन्हा दाखल केला होता. दाऊद इब्राहिम टोळीच्या मदतीने देशातील आघाडीच्या राजकीय नेत्यांना संपविण्याचा कट 'आयएसआय' (पाकची गुप्तचर यंत्रणा), लष्कर-ए-तोयबा, जैश-ए-मोहम्मद आणि अल-कायदाने रचल्याचे उघडकीला आले होते.

२ देशातील विविध शहरांतून घातपात, दंगली घडविण्याचाही कट होता. एवढेच नव्हे, तर भारतातील विविध शहरांमध्ये दंगली घडवण्यासाठी दाऊदने मुंबईसह अन्य ठिकाणी पुरविण्यासाठी मुंबईतील आपल्या हस्तकांना ही रक्कमही पाठवली होती. भारताची राजधानी नवी दिल्ली आणि महाराष्ट्राची राजधानी मुंबई कटाचे पहिले लक्ष्य होते.

# दाऊदचा पुन्हा देशावर दहशतवादी हल्ल्याचा कट

**पान १ वरून :** ठेवण्यात आली आहे. या माहितीनुसार, दाऊद इब्राहिम आणि छोटा शकील यांचे पैसे दुबईतून भारतात आणण्यात रशीद मारफानी ऊर्फ रशीद भाई हा प्रमुख मध्यस्थ म्हणून काम करत होता.

दाऊद, छोटा शकील, त्याचा मेहुणा सलीम फ्रूट, आरिफ शेख आणि शब्बीर शेख यांची नावे आरोपपत्रात आहेत. दाऊद, शकील वगळता तिघांना अटक करण्यात आली आहे. पाकिस्तानातून व्हाया दुबई, व्हाया सुरत २५ लाख रुपये मुंबईत कसे पाठविण्यात आले त्याचा तपशीलही 'एनआयए'ने दिला आहे. या २५ लाखांतील ५ लाख रुपये शब्बीर याने स्वत:जवळ ठेवून घेतले होते आणि उर्वरित २० लाख रुपये आरिफला दिले होते. हवालामार्गे आलेल्या रकमेतील ५ लाख रुपये 'एनआयए'च्या ९ मे २०२२ रोजीच्या छाप्यात शब्बीरच्या घराची झडती घेतली असता आढळून आले होते. तब्बल २९ ठिकाणांवर 'एनआयए'ने छापे टाकले होते.

हाजी अली, माहीम दर्ग्याचा सुहैल खंडवानी, समीर हिंगोरा, छोटा शकीलचा मेहुणा सलीम कुरैशी, दाऊदचा नातेवाईक गुड्डू पठाण, भिवंडीचा कय्युम शेख यांच्याविरोधातही चालू वर्षातील मे महिन्यात 'एनआयए'ने कारवाई केली होती.

**खंडणीचा पैसा अतिरेक्यांसाठी**

एनआयएच्या आरोपपत्रानुसार भारतातील दहशतवादी कारवायांसाठी केवळ पाकिस्तानातून पैसा येतो असे नव्हे, तर भारतातून वसूल केल्या जाणाऱ्या कोट्यवधी रुपयांच्या खंडण्यांतून उभी राहणारी रक्कमही दाऊद आणि छोटा शकील भारताच्याच विरोधात वापरत आहेत. एनआयएने 'डर्टी मनी' असा खास उल्लेख करून आरोपत्रात अशा खंडण्यांची काही उदाहरणेच दिली आहेत. यातील एका व्यावसायिकाकडून सलग १० वर्षे तब्बल १६ कोटी रुपयांची खंडणी दाऊद टोळीने उकळली. ही प्रचंड रक्कम आरिफ आणि शब्बीर यांच्या हवाला चॅनलद्वारे छोटा शकीलपर्यंत पोहोचली, असे एनआयएने म्हटले आहे.

2) पुढारी पान क्र. 1

दि. 09/11/2022

# २४ तासांत नऊ डीसीपी, एसपींच्या बदल्यांना ब्रेक

**नवी मुंबई : पुढारी वृत्तसेवा**

राज्यपोलीस दलातील १०९ पोलीस उपायुक्त, पोलीस अधीक्षक दर्जाच्या अधिकाऱ्यांच्या बदल्यांचे आदेश मंगळवारी दुसऱ्याच दिवशी बदलण्यात आले. सोमवारी झालेल्या या बदल्यांच्या आदेशाला चोवीस तास उलटत नाहीत तोच नऊ पोलीस उपायुक्तांच्या बदल्यांना मंगळवारी दुपारी ब्रेक मिळाला.

या अधिकाऱ्यांना वगळून इतर बदली झालेल्या अधिकाऱ्यांना तत्काळ कार्यमुक्त करण्याचे आदेश अपर पोलीस महासंचालक (आस्थापना) संजीव कुमार सिंघल यांनी दिले आहेत.

मंगळवारी ज्या १०९ पोलीस उपायुक्तांच्या बदल्या गृहखात्याने केल्या, त्यात दोन वर्षे आणि त्याहून अधिक कार्यकाळ पूर्ण केलेल्या अधिकाऱ्यांचा समावेश आहे. मात्र यापैकी प्रशांत मोहिते (एसीबी ठाणे), नम्रता पाटील (आर्थिक गुन्हे मुंबई), संदीप डोईफोडे (मिरा भाईंदर), दीपक देवराज एसआरपीएफ पुणे, सुनील लोखंडे (नागपूर शहर), प्रकाश गायकवाड सोलापूर शहर, तिरुपती काकडे (फोर्सवन मुंबई), योगेश चव्हाण नवी मुंबई आणि शर्मिला घार्गे (वालावलकर) एसीबी नाशिक यांच्या बदल्या थांबविण्यात आल्या आहेत.

विशेष म्हणजे ठाणे आणि नाशिक एसीबी अधीक्षकांच्या बदल्यांची दबक्या आवाजात चर्चा सुरू झाली आहे. पोलीस उपायुक्त सुनील लोखंडे हे ठाणे एसीबी अधीक्षक पदासाठी उत्सुक असून त्यासाठी ते प्रयत्नशील असल्याचे सांगितले जाते. या अधिकाऱ्यांच्या बदल्या दोन दिवसांत नव्याने केल्या जाण्याची शक्यता आहे.

3) पुढारी पान क्र. 7

## सायबर गुन्हे शाखेकडून विधी साक्षरता शिबिराचे आयोज़न

**मिरारोड :** मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयाचे कार्यक्षेत्रातील वसई पोलीस ठाणेचे हद्दीत न्यू इंग्लिश स्कुल, वसई येथे मा. सर्वोच्च न्यायालय, दिल्ली यांच्या निर्देशानुसार तालुका विधी सेवा समिती, वसई (जिल्हा व अति सत्र न्यायालय, वसई) यांच्या मार्गदर्शनानुसार विधी साक्षरता शिबिराचे रविवारी आयोजन करण्यात आले होते. या शिबिरात येणाऱ्या मान्यवरांसाठी तसेच नागरिकांच्या माहिती व जनजागृतीसाठी पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर, वसई-विरार यांचे आदेश व मार्गदर्शनानुसार सायबर गुन्हे कक्षाकडून दैनंदिन घडणारे गुन्ह्यासंदर्भात जनजागृतीसाठी स्टॉल लावण्यात आला होता. सदर स्टॉलमध्ये विविध प्रकारचे जनजागृती फलके तसेच नागरिकांसाठी माहिती पत्रके ठेवण्यात आलेले होते. या स्टॉलला अंदाजे २३० नागरिकांनी भेट देवून सायबर गुन्हयांसदर्भात होणाऱ्या गुन्हयांची माहिती घेतली. तसेच सायबर गुन्हे कक्षाकडून ठेवण्यात आलेल्या सेल्फी स्टँड सोबत सेल्फी काढून नागरिकांनी सदर उपक्रमाबाबत समाधान व्यक्त केले आहे.

4) पुढारी पू: पान क्र. 2

## वसईत १२ नोव्हेंबर रोजी ख्रिस्ती साहित्य संमेलन

**वसई : पुढारी वृत्तसेवा**

वसई मराठी ख्रिस्ती साहित्य मंडळ आणि महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने, तसेच बॅसीन कॅथॉलिक सहकारी बँकेच्या सहकार्याने दि. १२ नोव्हें. रोजी मराठी ख्रिस्ती साहित्य संमेलन स्व. फादर बर्नर्ड भंडारी सभागृह, वसई येथे आयोजित केले आहे.

अभिव्यक्ती स्वातंत्र्य आणि धर्मनिरपेक्षता हा संमेलनाचा विषय असून, ज्येष्ठ साहित्यिक उत्तम कांबळे हे उद्घाटक, तथा संमेलनाध्यक्ष लाभले आहेत. रेव्ह. फादर हिलरी फर्नांडिस प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार असून यावेळी ज्येष्ठ साहित्यिक, अँड्रू कोलासो यांना या वर्षीच्या गार्डवेल साहित्य पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार आहे.

या प्रसंगी विशेष अतिथी म्हणून माजी आमदार डॉमनिक घोन्साल्विस, बॅसीन कॅथॉलिक सहकारी बँकेचे अध्यक्ष रायन फर्नांडिस, फ्रँकलीन डायस, ज्येष्ठ साहित्यिक रेव्ह. फादर मायकल जी, फादर टोनी जॉर्ज, ज्येष्ठ कवयित्री डॉ. सिसिलिया कार्व्हालो उपस्थित राहणार आहेत.

दुसऱ्या सत्रात डॉ. सिसिलिया कार्व्हालो यांच्या अध्यक्षतेखाली साहित्य आणि अभिव्यक्ती स्वातंत्र्य या विषयावर परिसंवाद आयोजित केला आहे. या परिसंवादात मनोज आचार्य, मॅक्सवेल लोपीस, एल. बी. पाटील आणि छगन नाईक हे विचारवंत सहभागी होणार आहेत. चौथ्या सत्रात कवी प्रसाद कुलकर्णी यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित केलेल्या कवी संमेलनात १७ नामवंत कवयित्री व कवी सहभागी होणार आहेत.

या साहित्य संमेलनासाठी महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळातर्फे प्रसाद कुलकर्णी, योगेंद्र ठाकूर, प्रा. एल. बी. पाटील, अरुण शेवते आणि प्रेमानंद गज्वी हे ह्या साहित्य मेळाव्याला निरीक्षक म्हणून उपस्थित राहणार असल्याची माहिती वसई मराठी ख्रिस्ती साहित्य मंडळाचे अध्यक्ष रेमंड मच्याडो यांनी दिली.

5) पुढारी पू. पान क्र. 2

## सराईत दुचाकी चोरटे गजाआड

**विरार :** अलीकडे सर्व रस्त्यांवर दिवसेंदिवस हजारोच्या संख्येने वाढणाऱ्या दुचाकी गाड्या सर्व रस्त्यांवर गर्दी करुन उभ्या असतात. सराईत चोरट्यांनी अशा गाड्या चोरी करण्याचे सत्र आरंभले होते. या चोरट्यांना पेल्हार पोलिसांच्या गुन्हे शाखेने अटक करुन त्यांच्याकडून दोन दुचाकी ताब्यात घेतल्या आहेत. त्यांच्याकडून अधिक चोरलेल्या दुचाकींची माहिती उघड होण्याची शक्यता पोलिसांनी व्यक्त केली. चिराग मनोज मोरया (२०), अरबाज लतिफ राईन (१९) अशी या दोन चोरांची नावे आहेत. नालासोपारा पोलिसांनी पेल्हार, नालासोपारा, बिलालपाडा, पूर्व श्रीरामनगर या परिसरात दुचाकी चोरीच्या घटना वाढल्या असल्याच्या सांगितले. पेल्हारचे पोलिस निरीक्षक वसंत लब्दे, पेल्हार गुन्हे शाखेचे प्रभारी निरीक्षक महेंद्र शेलार यांच्या मार्गदर्शनाखाली उपनिरीक्षक सुनील पाटील व सहकाऱ्यांनी ही कारवाई केली.

6) पुढारी पान क्र. 4

दि. 09/11/2022

# एस्कॉर्ट सर्व्हिसच्या नावाखाली वेश्याव्यवसाय

## मिरारोडमधील घटना; चौघांवर गुन्हा; पीडितेची केली सुटका

**मिरारोड : पुढारी वृत्तसेवा**

ऑनलाईनवर एस्कॉर्ट सर्व्हिसच्या नावाखाली जाहिरात देऊन देहव्यापार चालवणाऱ्या चौघांवर अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कक्षाच्या पथकाने कारवाई केली आहे. यावेळी एका पीडित तरुणीची सुटका करण्यात आली आहे.

मुंबईच्या दहिसर पूर्वेकडील कांडरपाडा येथे राहणारा विकी उर्फ विजय यादव आणि राहुल उर्फ आलोक रवानी इंटरनेटच्या ऑनलाईनवर एस्कॉर्ट सर्व्हिसची जाहिरात देतात. त्यानंतर गिऱ्हाईकांना लॉजमध्ये खोली बुक करून देहव्यापारासाठी मुलींची विक्री करत असल्याची माहिती अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक शाखेला मिळाली होती. याची माहिती मिळाल्यावर पोलीस निरीक्षक समीर अहिरराव यांनी कायदेशीर बाबींची पूर्तता करून बोगस गिऱ्हाईकाच्या माध्यमातून विकी यादवशी संपर्क साधला. त्यानंतर विकी यादव



याने ठरल्यानुसार रिक्षाचालक सुरेश यादव याच्या रिक्षातून मिरारोड पूर्वेकडील हॉटेल पार्क व्ह्यू येथे तरुणीला घेऊन आला होता. त्यानंतर बोगस गिऱ्हाईकांकडून ठरलेली रक्कम स्विकारून तरुणीला देहव्यापारासाठी पुरवत असताना पोलीस पथकाने त्याला रंगेहाथ ताब्यात घेतले. यादवने पोलिसांना रविकुमार उर्फ इंदोराम हा दहिसर येथील कांडरपाडा येथे राहणारा तरुण मुली पुरवीत असल्याची माहिती दिली. त्यानंतर पोलिसांनी रविकुमारला त्याच्या घरातून ताब्यात घेतले.

याप्रकरणी रविकुमार इंदोराम, सुरेश यादव, विकी उर्फ विजय यादव व राहुल उर्फ अलोक रवानी यांच्याविरुध्द मिरारोड पोलीस ठाण्यात भा.द.वि.सं. कलम ३७०, ३४ सह अनैतिक व्यापार प्रतिबंध कायदा १९५६ चे कलम ४, ५ नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पालघर जिल्ह्यातील मिरा-भाईंदर, वसई- विरार पोलीस आयुक्तालयाच्या हद्दीत चेन स्नॅचिंग, घरफोडी, महामार्गावरील प्रवाशांची लूट या घटना वाढलेल्या असून चोरट्यांचा छडा लावणे पोलिसांसमोर आव्हान असतानाच या परिसरात छुप्यारितीने वेश्याव्यवसाय चालविले जात असल्याने पोलिसांसमोर तपासाचे आव्हान उभे ठाकले आहे.

7) पुढारी पान क्र. 5

# ऑर्केस्ट्रा बारच्या नावाखाली बीभत्सपणा

## काशिमिरा येथील नाईट सिटी बारवर धाड, ५ मुली, १२ ग्राहकांना अटक

**मिरारोड : पुढारी वृत्तसेवा**

काशीमिरा येथील नाईट सिटी डान्सबार ऑर्केस्ट्रा बारच्या नावाखाली डान्स बार चालविणाऱ्या डान्स बारवर काशिमिरा गुन्हे शाखेच्या पोलिसांनी धाड टाकून कारवाई केली आहे.

काशिमिरा परिसरातील ऑर्केस्ट्रा बारमध्ये ऑर्केस्ट्राच्या नावाखाली डान्स सुरू असल्याची माहिती पोलिसांनी मिळाली होती. माहिती मिळताच काशिमिरा गुन्हे शाखेने सापळा रचून मालकाच्या फायद्यासाठी ग्राहकांकडून पैशाची उधळण करत डान्स करताना ५ मुलींना ताब्यात घेत त्यांची सुटका करण्यात आली. त्यासोबतच १२ ग्राहकांना अटक केली आहे. तसेच बारमध्ये काम करणारे २ मॅनेजर, १ कॅशिअर, ३ वेटर, २ वादक, १ पुरुष सिंगर यांनाही अटक करण्यात आली आहे. अटक केलेल्यांमध्ये मॅनेजर दिनेश शेट्टी, लाईन मॅनेजर गणेश पुजारी, कॅशिअर संतोष देवाडीगा, कीबोर्ड वादक राजेश जाधव, ऑक्टो पॅड वादक मोहम्मद सिद्दीकी, सिंगर अन्वर खान, सिंगरच्या नावाखाली डान्स करणाऱ्या पाच मुली यांना ताब्यात घेऊन त्यांची मुक्तता करण्यात आली आहे. तसेच १२ ग्राहकांना अटक करण्यात आली आहे. तसेच हॉटेल चालक व मालक उदय शेट्टी, उमेश शेट्टी व हरिश आण्णा यांच्याविरुध्द महाराष्ट्र हॉटेल उपगृहे आणि मद्यपान कक्ष यामधील नृत्य व अश्लिल नृत्यावर प्रतिबंध घालण्याबाबत महिलेच्या प्रतिष्ठेचे संरक्षण करण्याबाबत अधिनियम २०१६ च्या नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही कारवाई गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक अविराज कुराडे व त्यांच्या पथकाने केली आहे.

### नियमांना पायदळी तुडवून उभा राहिला बार

काही महिन्यांपूर्वी सदरील डान्सबार वर आयुक्त दिलीप ढोले यांच्या मार्गदर्शनाखाली तोडक कारवाई करण्यात आली होती, मात्र पुन्हा ती बांधकामे उभी राहत नियमांना पायदळी तुडवत डान्सबार सुरू करण्यात आला आहे, यामुळे आश्चर्य व्यक्त करण्यात येत आहे.

८) पुण्यनगरी पृ. पान क्र. १

दि: 09/11/2022

# मीरा-भाईंदर, वसई-विरार पोलिस आयुक्तालयात फेरबदल

## नव्या पाच पोलिस उपायुक्तांच्या नियुक्त्या

**। मीरा रोड :** मीरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयात नवीन पाच पोलीस उपायुक्तांच्या नियुक्त्या करण्यात आल्या आहेत. तर चार उपायुक्तांच्या बदल्या करत पोलीस आयुक्तालयात मोठे फेरबदल करण्यात आले आहेत.

मीरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयात दोन दिवसांपूर्वी जयंत बजबळे यांची पोलीस मुख्यालय उपायुक्तपदी नियुक्ती करण्यात आली आहे. शनिवारी त्यांनी कार्यभार स्वीकारला. दोन वर्षे उपायुक्त मुख्यालय पदाचा कारभार सांभाळणारे विजयकांत सागर यांच्या जागेवर त्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. राज्यातील पोलीस दलातील अधिकाऱ्यांच्या सोमवारी बदल्या करण्यात आल्या आहेत. यामध्ये मीरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस उपायुक्त कार्यालयात सुरेश कुमार एस. मेंगडे (पोलीस उपायुक्त गुन्हे, नवी मुंबई) यांची पोलीस उपायुक्त मीरा-भाईंदर, वसई-विरार, अविनाश एम. अंबुरे (पोलीस उपायुक्त, परिमंडळ १ ठाणे शहर) यांची पोलीस उपायुक्त - मीरा-भाईंदर, वसई-विरार, संदीप आर. डोईफोडे (पोलीस अधीक्षक फोर्स वन महाराष्ट्र राज्य मुंबई) याची पोलीस उपायुक्त - मीरा-भाईंदर, वसई-विरार, सुहास पी. बावचे (उपायुक्त राज्य गुप्तवार्ता विभाग मुंबई) यांची पोलीस उपायुक्त मीरा-भाईंदर, वसई-विरार येथे नियुक्ती करण्यात आली आहे. तर अमित काशिनाथ काळे (पोलीस उपायुक्त, परिमंडळ १ मीरा-भाईंदर, वसई-विरार) यांची बदली पोलीस उपायुक्त नवी मुंबई, संजय कुमार सुरगौडा पाटील (पोलीस उपायुक्त परिमंडळ २ मीरा-भाईंदर, वसई-विरार) यांची बदली पोलीस उपायुक्त नवी मुंबई येथे करण्यात आली आहे. विजयकांत मंगेश सागर (पोलीस उपायुक्त गुन्हे - मीरा-भाईंदर, वसई-विरार), प्रशांत विजयकुमार वाघुंडे (पोलीस उपायुक्त - मीरा-भाईंदर, वसई-विरार) या दोन अधिकाऱ्यांची महाराष्ट्र पोलीस अधिनियम याच्या कलम २२ न यामधील तरतुदीनुसार बदली करण्यात आली असून त्यांच्या पदस्थापनेचे आदेश स्वतंत्रपणे काढण्यात येणार आहेत.

९) पुढारी पृ. पान क्र. १

## पोलिसाला मारहाण; ३ जणांना अटक

**नालासोपारा :** नालासोपारा पेल्हार पोलीस ठाण्यात कार्यरत सहायक पोलीस फौजदारास गुंडांनी मारहाण केल्याची घटना समोर आली आहे. फौजदारांवर विरारच्या संजीवनी रुग्णालयात उपचार सुरू असून पोलिसांनी ३ जणांना अटक केली आहे. पेल्हार पोलीस ठाण्यात सहायक फौजदार म्हणून कार्यरत असलेले संजीव पंडित सोनवणे (५३) हे शनिवारी दाखल असलेल्या अदखलपात्र गुन्ह्यातील विरोधकांना समज देण्यासाठी जीवदानी चाळ, बिलालपाडा परिसरात गेले असता सात ते आठ महिला, पुरुषांनी त्यांना दमदाटी करून शिवीगाळ करून लाकडी दांडक्याने मारहाण केली.

१०) पुण्यनगरी पृ. पान क्र. 4

# मीरा-भाईंदर, वसई-विरारमध्ये पोलीस भरती होणार

## ९९६ पोलीस शिपाई, तर १० चालक पदे भरणार

**। मीरा रोड :** राज्यातील सर्व जिल्हा पोलीस दल व आयुक्तालयामध्ये पोलीस शिपाई पदांची भरती प्रक्रिया राबविण्यात येणार असून मीरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयामध्ये देखील ९९६ पोलीस शिपाई पदांसाठी पोलीस भरती प्रक्रिया राबवण्यात येणार आहे. या पोलीस भरतीमध्ये ९८६ पोलीस शिपाई व १० चालक पोलीस शिपाई अशी पोलीस शिपाई भरती करण्यात येणार आहे. या भरती प्रक्रियेतील आवेदनपत्र संगणकीय प्रणालीद्वारे ९ ते ३० नोव्हेंबर २०२२ या कालावधीत स्वीकारण्यात येणार आहेत. याबाबतीत सविस्तर माहिती policerecruitment2022.mahait.org आणि www.mahapolice.gov.in या संकेतस्थळांवर



उमेदवारांच्या माहितीसाठी प्रसिद्ध करण्यात आली आहे.

मीरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयामध्ये मंजूर मनुष्यबळापेक्षा एक हजार पोलीस अंमलदारांची पदे रिक्त असल्याने मोठ्या प्रमाणात मनुष्यबळाची कमतरता जाणवत होती. या नवीन पोलीस भरतीमुळे आयुक्तालयातील पोलीस दलामध्ये ९९६ पोलीस अंमलदारांची भर पडून जनतेच्या सेवेमध्ये नवीन पोलीस अंमलदार सेवेसाठी दाखल होणार आहेत. ही भरती पारदर्शकपणे पार पडण्यासाठी सर्व स्तरावर विशेष उपाययोजना करण्यात येणार आहेत, अशी माहिती पोलीस आयुक्तालयाकडून देण्यात आली आहे.

११) सकाळ पृ. पान क्र. १

## तडीपारीचे उल्लंघन करणाऱ्याला अटक

**भाईंदर (बातमीदार) :** तडीपारी आदेशाचे उल्लंघन करणाऱ्या सराईत गुन्हेगाराला गुन्हे शाखेच्या पोलिसांनी मिरा रोड येथून अटक केली आहे. अनेक गुन्ह्यात सहभागी असलेल्या जरियाब जलील सय्यद याला पोलिस उपायुक्त कार्यालयाने ठाणे जिल्ह्यासह, मुंबई, पालघर, रायगड या जिल्ह्यातून दोन वर्षांसाठी मे महिन्यात तडीपार करण्यात आले होते. मात्र या आदेशांचे उल्लंघन करुन जरियाब हा मिरा रोडच्या नयानगर भागात फिरत असल्याचे पोलिसांच्या गस्त पथकाला शनिवारी रात्री दिसून आले. जरियाब याला ताब्यात घेऊन नयानगर पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले आहे.

१२) लोकमत पान क्र. 1 दि: 09/11/2022

# जितेंद्र आव्हाडांसह १०० कार्यकर्त्यांवर गुन्हा

## चित्रपटगृहात दाम्पत्याला मारहाण; 'हर हर महादेव' चित्रपटाचा शो बंद पाडताना झाला वाद

लोकमत न्यूज नेटवर्क

**ठाणे :** विवियाना मॉलमध्ये 'हर हर महादेव' या चित्रपटाचा सोमवारी रात्री खेळ बंद पाडण्यासाठी गेल्यानंतर एका प्रेक्षकाला मारहाण केल्याप्रकरणी माजी गृहनिर्माण मंत्री तथा राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते जितेंद्र आव्हाड यांच्यासह सुमारे १०० कार्यकर्त्यांविरुद्ध ठाण्यातील वर्तकनगर पोलीस ठाण्यात मंगळवारी गुन्हा दाखल झाला. याप्रकरणी चौकशी सुरू असल्याचे पोलिसांनी सांगितले.



महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने मंगळवारी ठाण्यात हर हर महादेव चित्रपटाचे मोफत शो आयोजित केले होते.

अमोल मिटकरींनी अमेय खोपकरांना उद्या चित्रपट लावून दाखवा, असे सांगितले. त्यामुळे माजी मंत्री जितेंद्र आव्हाड यांच्या घराजवळ असलेल्या मॉलमध्ये 'हर हर महादेव'चा शो लावला आहे. मनसेचे कार्यकर्ते टॉकीजमध्ये आहेत. ज्याला वाटत असेल त्यांनी येऊन राडा करावा. जितेंद्र आव्हाड आम्हाला इतिहास शिकवणार का?
- अविनाश जाधव, अध्यक्ष, मनसे. ठाणे जिल्हा

मराठ्यांच्या इतिहासाचा विपर्यास कुठल्या हेतूने? शिवाजी महाराज विरुद्ध बाजीप्रभू देशपांडे हे महाराष्ट्र पचवेल? मागील ६०-७० वर्षांमध्ये मराठ्यांचा इतिहास विकृत करण्याचे असंख्य प्रयत्न झाले. महाराजांच्या इतिहासाची सिनेमाद्वारे वारंवार विकृत मांडणी करणारे दिग्दर्शक सनातनी मनुवादी आहेत.
- जितेंद्र आव्हाड, माजी मंत्री

छत्रपती शिवाजी महाराजांवरील चित्रपटाचे शो बंद पाडून तुम्ही महाराजांचा अपमान करत आहात. यासाठी सर्वांनी महाराष्ट्राची आणि छत्रपती शिवाजी महाराजांची जाहीर माफी मागावी. आयुष्यातील आठ वर्षे यासाठी खर्च केल्याने महाराजांचा अवमान होईल, असे संदर्भ वापरू शकत नाही. सेन्सॉर बोर्डाच्या प्रश्नांची उत्तरे दिल्यानंतरच चित्रपटाला प्रमाणपत्र मिळाले आहे. घडलेला प्रकार लांच्छनास्पद असून याची निंदा करतो. - अभिजीत देशपांडे, लेखक- दिग्दर्शक

माजिवडा येथील रहिवासी परीक्षित धुर्वे यांच्या तक्रारीनंतर गुन्हा दाखल झाला. सिनेमा चालू असताना रात्री ९.५५ वाजण्याच्या सुमारास अचानकपणे माजी मंत्री आव्हाड हे त्यांच्या कार्यकर्त्यांसह चित्रपट बंद पाडण्याच्या उद्देशाने सिनेमागृहात शिरले. त्यांनी या 'चित्रपटामध्ये चुकीचे दृश्य दाखविले जात असल्याने हा चित्रपट बंद करा' असे सांगत चित्रपट बंद पाडला.

त्यावेळी चित्रपट पाहणाऱ्यांपैकी एक अनोळखी प्रेक्षक 'असे कसे कोणीही ऐरागैरा येईल आणि चित्रपट बंद पाडेल' असे बोलला. त्याचाच राग मनात धरून चित्रपट बंद पाडण्यासाठी आलेल्या या आक्रमक कार्यकर्त्यांपैकी काही जण चित्रपट पाहणाऱ्या लोकांच्या अंगावर धावून गेले. तेव्हा परीक्षित आणि त्यांची पत्नी हे अग्रभागी असल्याने जमावातील आठ ते दहा लोकांनी या दोघांना धक्काबुक्की करून ठोसा-बुक्कीने मारहाण केल्याचे तक्रारीत म्हटले आहे.

परीक्षित यांनी आपल्यावर ओढवलेल्या प्रसंगाची वर्तकनगर पोलीस ठाण्यात मंगळवारी तक्रार दाखल केली. आरोपींना नोटीस देण्याची प्रक्रिया सुरू असल्याचे वर्तकनगर पोलिसांनी सांगितले.

१३) सकाळ पु. पान क्र. १




**पालघर :** राष्ट्रवादी काँग्रेसच्या कार्यकर्त्यांनी अब्दुल सत्तार यांच्या निषेधार्थ हुतात्मा चौक परिसरात निदर्शने केली.

# सत्तारांच्या विरोधात राष्ट्रवादीचे आंदोलन

वसई, ता. ८ (बातमीदार) : अब्दुल सत्तार यांनी खासदार सुप्रिया सुळे यांच्याबाबत केलेल्या आक्षेपार्ह विधानाचे वसई विरार शहरात पडसाद उमटले आहेत. राष्ट्रवादीच्या कार्यकर्त्यांनी अब्दुल सत्तार यांच्या छायाचित्राला जोडे मारून निषेध व्यक्त करत त्यांची मंत्रिमंडळातून हकालपट्टी करावी, अशी मागणी केली.

### पालघरमध्येही निषेध

पालघर (बातमीदार) : अब्दुल सत्तार यांच्या विधानाच्या निषेधार्थ पालघरमध्ये तालुका राष्ट्रवादी काँग्रेसच्या कार्यकर्त्यांनी हुतात्मा चौकात आंदोलन केले. पालघर तालुक्यातील राष्ट्रवादी काँग्रेसचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

---

राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी वसई विरार शहर जिल्ह्यातर्फे जिल्हाध्यक्ष राजाराम मुळीक यांच्या नेतृत्वाखाली हे आंदोलन वसईत करण्यात आले. या वेळी राष्ट्रवादी महिला आघाडी, युवती सेल, विद्यार्थी काँग्रेस, सामाजिक न्याय विभाग, ओबीसी विभागाचे पदाधिकारी कार्यकर्ते उपस्थित होते.

महिलांविषयी बेताल वक्तव्य करणारे मंत्रिमंडळात कसे काय राहतात. जोपर्यंत सरकार त्यांचा राजीनामा घेत नाही, तोपर्यंत अशी आंदोलने होतच राहणार, असे यावेळी मुळीक यांनी सांगितले.

14) म. टा. पान क्र. 14

दि. 09/11/2022

# आता उरलो शिष्टाचारापुरता...

prashant.aher
@timesgroup.com
tweet : PrashantAherMT



मटा विशेष

**पुणे :** पोलिसांच्या कार्यक्रमांमध्ये राज्याच्या पोलिस दलाचे प्रमुख असलेल्या महासंचालकांचे स्थान फक्त निमंत्रण पत्रिकेत नावापुरते राहिले आहे. खुद्द पोलिस महासंचालकांनी याबाबत खंत व्यक्त केली असून, हा प्रकार शिष्टाचार व शिस्तीचे उल्लंघन असल्याची लेखी तंबी त्यांनी दिली आहे.

राज्यातील विविध जिल्हा, शहर पोलिस दलांकडून मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, गृहमंत्री, केंद्रीय मंत्री, पालकमंत्री यांना कोणत्या ना कोणत्या निमित्ताने कार्यक्रमांसाठी निमंत्रित करण्यात येते. मात्र, या कार्यक्रमांचे आयोजन करताना आपल्याकडे विचारणा न करता केवळ औपचारिकता म्हणून त्यांचे नाव निमंत्रण पत्रिकेत टाकण्यात येत असल्याबाबत पोलिस महासंचालकांनी नाराजी व्यक्त केली आहे. ही बाब शिष्टाचार नियमांचे व कार्यालयीन शिस्तीचे उल्लंघन करणारी असल्याची तंबीही त्यांनी आपल्या सहकाऱ्यांना दिली आहे.

पोलिस महासंचासक कार्यालयाचे प्रशासन प्रमुख अप्पर पोलिस महासंचालक अनुप कुमार सिंह यांनी सर्व पोलिस घटकांना नुकतेच एक पत्र पाठवले आहे. हे पत्र पोलिस महासंचालक रजनीश सेठ यांच्या मान्यतेने पाठविण्यात आल्याचे या पत्रात नमूद करण्यात आले आहे. राज्यातील सर्व पोलिस घटकांनी यापुढे कुठल्याही महत्त्वाच्या कार्यक्रम, समारंभाच्या आयोजनाबाबत पोलिस महासंचालक यांना पुरेशा कालावधीपूर्वी कल्पना द्यावी, असा आदेश देण्यात आला आहे.

## राज्याच्या पोलिस महासंचालकांनी व्यक्त केली खंत

राज्यातील पोलिस घटकांशी संबंधित कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येते. या कार्यक्रमांना राज्याचे मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, गृहमंत्री, केंद्रीय मंत्री, पालकमंत्री यांना आवर्जून निमंत्रित करण्यात येते. राजसत्तेशी जुळवून घेणे; तसेच पोलिस दलाचा जनसंपर्क वाढवणे हा यामागे हेतू असतो. हे सर्व कार्यक्रम घाईघाईने आयोजिले जातात. त्यामध्ये पोलिस अधीक्षक कार्यालय, पोलिस ठाणे, पोलिस चौकी, निवासी संकुल आदींचे उद्घाटन समारंभ; तसेच विविध उपक्रमांच्या निमित्ताने राजकीय व्यक्तींना निमंत्रित करण्यात येते, असे या पत्रात नमूद करण्यात आले आहे.

'या कार्यक्रमांसाठी प्रामख्याने मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, गृहमंत्री, केंद्र-राज्यातील मंत्री, जिल्ह्याचे पालकमंत्री यांना प्रमुख पाहुणे म्हणून बोलावले जाते. शासकीय समारंभांसाठी प्रमुख पाहुणे निमंत्रित करणे, त्यांचे सन्मानपूर्वक योग्य आदरातिथ्य करणे, यासाठी राज्य सरकारच्या सामान्य प्रशासन विभागाने यापूर्वीच सूचना दिलेल्या आहेत. मात्र, असे निदर्शनास आले आहे की, काही घटक कार्यालयांकडून आयोजित करण्यात येणाऱ्या महत्त्वाच्या समारंभाबाबत पोलिस महासंचालक व इतर वरिष्ठ अधिकाऱ्यांना पुरेशा कालावधीपूर्वी माहिती देण्यात येत नाही किंवा या कार्यक्रमांबाबत ते अनभिज्ञ असतात', असे सिंह यांनी नमूद केले आहे.

15) म.टा.पू. पान क्र. 1

# गटारात मिळाला महिलेचा मृतदेह

**म. टा. वृत्तसेवा, वसई**

विरारमध्ये रस्त्याकडेला असलेल्या गटारात एका ६० वर्षीय महिलेचा मृतदेह सोमवारी मिळाला. या महिलेचा मृत्यू नेमका कशामुळे झाला, याबाबत माहिती समोर आलेली नाही. या प्रकरणी विरार पोलिसांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे. गटारात पडून मृत्यू झाल्याचा संशय कुटुंबियांनी व्यक्त केला आहे.

कमलाबेन गुलाबचंद शाह असे मृत महिलेचे नाव असून त्या विरारच्या एम. बी. इस्टेट परिसरात राहत. सोमवारी पहाटे साडेपाच वाजण्याच्या सुमारास त्या विवा कॉलेज रोडवरील स्वामी नारायण मंदिरात पूजेसाठी घरातून निघाल्या होत्या. मात्र सकाळचे १० वाजले, तरी त्या घरी न परतल्याने कुटुंबीयांनी शोधाशोध सुरू केली. त्यानंतर सायंकाळी एका मुलाला मंदिराजवळ गटाराच्या उघड्या चेंबरमध्ये या महिलेचा हात दिसला. बाहेर काढल्यानंतर, त्या कमलाबेन याच असल्याचे लक्षात आले. विरार पोलिसांनी घटनास्थळी पोहचत मृतदेह शवविच्छेदनासाठी पाठवला आहे. या महिलेचा मृत्यू नेमका कशामुळे झाला, याबाबत विरार पोलिस तपास करत असून या प्रकरणी अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे.

16) लोकसत्ता पू. पान क्र. 3

## पैशांच्या वादातून मित्राची हत्या

**विरार :** उसने पैशांवरून झालेल्या वादात तरुणाने त्याच्या मित्राची हत्या केल्याची घटना वसई पूर्वेच्या वालीव परिसरातील वाकणपाडा येथे घडली. वालीव पोलिसांनी आरोपीला अटक केली आहे.

वाकीपाडा परिसरात राहणारा विमलेश राजेश पाठक (२७) हा मेजवानीसाठी मित्र विक्रमच्या घरी गेला होता. त्या वेळी त्यांच्यात उसने घेतलेल्या हजार रुपयांवरून वाद सुरू होऊन त्यांच्यात हाणामारी सुरू झाली. विक्रमने तुटलेल्या भिंतीची वीट घेऊन विमलेशच्या डोक्यात घातली. त्यात त्याचा मृत्यू झाला.